**ISSN 2277 - 5730**

**AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL**

# AJANTA

Volume - IX Issue - IV October - December - 2020

ENGLISH / MARATHI

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय कामशिल्पांचा उद्‌गम आणि विकास<br>**प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के** | १-७ |
| २ | जागतिकीकरण आणि भारतातील उद्योग व्यापार<br>**प्रा. कल्पना काळे** | ८-११ |
| ३ | जागतिकीकरणाचे शेती व ग्रामीण विकासावरील परिणाम<br>**मनोहर रामचंद्र चौधरी** | १२-१७ |
| ४ | प्राचीन भारतातील मानवाची प्रगती<br>**डॉ. मीना चंद्रभान साळे** | १८-२० |
| ५ | जातीव्यवस्था व दलित समाजसुधारक: विशेष संदर्भ मराठवाडा विभाग<br>**प्रा. डॉ. एन. बी. सूर्यवंशी**<br>**गायकवाड प्रतिमा बाळासाहेब** | २१-२७ |
| ६ | आद्यक्रांतीवीर उमाजी नाईकांचा स्वातंत्र्यलढा<br>**प्रा. श्रीमती संध्या जयसिंग माने** | २८-३१ |
| ७ | खान्देशातील मानव विकासाचा अभ्यास<br>**प्रा. श्री. सुनिल पंडित बोरसे** | ३२-३८ |
| ८ | मराठी साहित्य अभ्यासाची गरज<br>**प्रा. डॉ. सुनील मधुकर पवार** | ३९-४२ |
| ९ | भारतीय स्वातंत्र्यलढा व त्याचे परिणाम<br>**डॉ. सुनीता श्रीकांत पांडे** | ४३-४७ |
| १० | दलित चळवळीत विठ्ठल रामजी शिंदे यांचे योगदान<br>**प्रा. डॉ. सुरेश अंबादास कातळे** | ४८-५१ |
| ११ | ग्रंथालयांचा विकास : ग्रंथपालाची भुमिका<br>**प्रा. डॉ. तोटे दादासाहेब सर्जेराव** | ५२-५५ |
| १२ | ग्रंथ व ग्रंथाल्याचा "उदय" विकास ग्रंथ व ग्रंथाल्याचा उदय आणि विकास<br>**प्रा. सुर्यवंशी उमलाकर आनंदराव** | ५६-५९ |

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १. भारतीय कामशिल्पांचा उद्‌गम आणि विकास

**प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के**
संशोधन मार्गदर्शक, प्रमुख, इतिहास विभाग, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर, जि. नांदेड.

कामशिल्प ही 'निधर्मी कला' सदरात मोडणारी असून ती कालातीत आहेत असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. ही कला केवळ 'भारतीय कला' असे म्हणता येईल कारण 'हिंदुस्थानी कला' असे म्हणाल्यास भौगोलिक सिमा डोळयासमोर येतात. 'इंडियन आर्ट' म्हटल्यास गुलामगिरीतील भारताची जाणिव होते. या मुळे 'भारतीय कला' म्हणणे जास्त संयुक्त वाटत असल्याने ही 'निधर्मी भारतीय कला' असे म्हणत असताना यात भारतीयांनी केलेल्या सर्व सकारात्मक आणि नकारात्मक कामाचा अंतर्भाव होतो. यास 'भारतीय कला' म्हणण्याचे अजून एक कारण म्हणजे १९०१ पूर्वी भारतीय कलेचे धर्मांच्या नावाने वर्गीकरण करण्यात आले नव्हते. असे वर्गीकरण ग्रुनबेडेल याचा 'बुध्दीस्ट आर्ट इन इंडिया' आणि विंसेंट स्मिथ यांनी 'जैन आर्ट ॲण्ड आवर एण्टिक्विटीज' या पुस्तकान्वये धार्मिक आधारावर कलेचे विभाजन केले.[1] प्राचीन मूर्ती कला केंद्रातील मथुरा येथे कुशान आणि गुप्त काळातील सर्वच मूर्ती मिळतात. या मूर्ती पाहिल्या नंतर एक बाब लक्षात येते की, शैलीत अंतर आहे, पण स्वरूपात अंतर दिसून येत नाही. जसेश्शरीर ठेवण, उभेराहण्याची पध्दत, मुखमंडल, भावाभिव्यक्ती, प्रभामंडल, बसण्याची पध्दत, हस्तमुद्रा ई. स्वरूप सारखेच असून शैलीत बदल होण्याचे कारण म्हणजे ग्रांथीक उल्लेखनुसार लांच्छनात असलेला बदल होय.[2] 'लांच्छन' म्हणजे मूर्तीचे वाहन आणि शस्त्र होय. या सर्व मूर्तींचे स्वरुप सारखेच असल्याने त्यांना 'भारतीय कला' म्हणणेच जास्त संयुक्तिक ठरेल.

**कीवर्ड –** कामशिल्प, मूर्तीकला, खजुराहो, तंत्रशास्त्र

**गृहितके**

१. भारतीय मूर्तीकलेस धर्मश्रध्देने समृध्द केले आहे आणि ही कला नेहमी धर्मानुकुल राहिलेली आहे.
२. शिल्पकला ही भूतकाळ आणि वर्तमान काळ यातील मूकसंवाद असतो.
३. भारतीय मूर्तीकलेसोबतच कामशिल्पाची निर्मिती झाली असे बहुतेक कला समिक्षक मानतात.

**कामशिल्पांचा पूर्वार्ध अर्थात मधुराभक्ती**

जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ म्हणून मान्यता पावलेल्या ऋग्वेदातील नासदियसुक्तात एक ऋचा येते त्यानुसार,

**कामस्तदग्रे समवर्तताधि**
**मनसो रेतः प्रथमं यदासीद।**

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER – 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

**सतो बन्धुमसति निरविंदन्**

**हृदि प्रतीष्या कवयो मनीषा।।**[3]

अर्थात ब्रम्हाच्या मनोबीजातून सर्वप्रथम कामबीज(सृष्टीनिर्माण प्रवृत्ती) निर्माण झाले मूळ परब्रम्हाचा (असत्) विनाशी आणि दृश्य सृष्टीशी (सत्) जडलेला हा पहिला सबंध होय त्यानंतर निर्माण झालेल्या वैदिक साहित्यापासून ते भक्ती वाङमयापर्यंत सर्वच साहित्यात मधुराभक्ती अर्थात परमेश्वर भक्तीत लिन होणे या साठी किंवा एकरूपतेसाठी मिलनाचा आधार घेतलेला असतो. उदा

- इंद्रा तुझ्यासाठी गायलेली स्तोत्रे ही आवडत्या पुरूषाला स्पर्श करणाऱ्या कामी स्त्री प्रमाणे भक्तांची प्रार्थना धाव घेत आहे [४]
- सर्वव्यापी आणि कामेच्छू भक्ताची स्तोत्र वीर पुरूषाच्या प्रियसी प्रमाणे इंद्राला अलिंगन देतात [५]
- वेद, गाहासत्तसई, कुमारसभव काव्यप्रकाश ई. साहित्यात रसभरीतश्शृंगारीक वर्णन येतात

**कामशिल्पांविषयी निर्माण होणारे काही प्रश्न**

- मंदिर शिल्प हे धर्म शिल्प होते तर काम शिल्पे का कोरली ?
- मनुष्य जीवनाचे चतुर्विध वर्गिकरण हे पुरूषार्थात असल्याने त्यातील काम कोरला असेल का ?
- कामशिल्पा बाबतीत भारत हा अग्रगण्य देश आहे तरीही या शिल्पाचे प्रयोजन का सांगता येत नाही ?
- भारतीय कला ही संदेश देण्यासाठी असेल तर त्याची प्रेरणा कोणती असेल ?
- समकालीन राजानी अशा कामशिल्पाना उत्तेजन का दिले असेल ?
- विविध स्वरूपातील कामशिल्पे हजारो वर्ष निर्माण केली जात होती तर त्या मागील तात्विक अधिष्ठाण काय असावे ?

**मूर्तीकलेत दिसणारी कामशिल्पे**

खजुराहोंची कामशिल्पे प्रकाशात आणण्याचे काम पाश्चात्यानी केले तेव्हा त्यांच्यासाठी ते, "तसले काही नरी " होते कारण त्यांच्या साठी हे सारे चर्चा करण्यासाठी निषिध्द होते ही शिल्पे अश्लिल, अनैतिक ठरविली गेली होती भारतात सापडणारी कामशिल्पे यांचे वर्गिकरण पुढील प्रमाणे करता येईल

- नग्नता प्रदर्शित करणारी
- सामान्य मिथुन युगल (सुरसुंदरी आणि मिथुन शिल्पाना प्राथिक आधार आहे )
- चुंबन, अलिंगन देणारी
- कामोद्दिपन करणारी
- मैथुनरत असलेली
- विभिन्न मैथुन मुद्रा

- मानव पशू संबंध (मैथुन)
- मुखमैथुन
- या कामशिल्पात मादक व उत्तान भाव दिसत नाहीत
- चेहऱ्यावर स्मित, समाधान आणि तृप्ती
- समागम शिल्प असले तरी यांची चेहरे मात्र शांत असून तपस्वीची वाटावीत येवढी समाधानी दिसतात. म्हणजे ते कामकलेत निपुण असून आपल्याला कामकला शिकवित आहेत असेच सुचित होते
- कामशिल्पात अलंकार फारच कमी दाखविण्यात येतात. असलेच तर ती त्यांच्या शरीराला उठावदार बनविण्यास मदतच करतील असे असतात

कामशिल्पाचा प्रारंभिक अविष्कार सिंधू संस्कृतीतून पहावयास मिळतो. सिंधू संस्कृतीमध्ये आढळून आलेली लिंग सादृष्य मूर्ती या कामशिल्पाचा पहिला अविष्कार म्हणता येईल. पुढे कामदेवाची प्रतिमा कशी करावी याचा उल्लेख विष्णूधर्मोत्तर पुराणात मिळतो[६] तर भासाच्या चारूदत्त नाटकात कामदेवानुनय या मिरवणूकीचा उल्लेख आहे[७] सिंधूसंस्कृती नंतर एकदम मौर्यकाळातच आम्हाला मूर्तीकलेचे पुरावे उपलब्ध होतात. मधील चौदाशे – पंधराशे वर्ष मूर्ती अथवा चित्रकलेचा कोणताही पुरावा उपलब्ध होत नाही ही एक आश्चर्याचीच बाब म्हणावी लागेल. मौर्य काळानंतर बौध्द कलाविष्कारास सुरूवात झाली. स्तूप आणि त्यावरील कठड्यावर विलक्षण चित्तवेधक, घाटदारशरीर, रेखीवपणा, गतीमानता असलेली शिल्पे तयार व्हायला लागली. या मुळे ती सारी शिल्प आकर्षित वाटतात. मौर्यकाळानंतर गांधार, सांची, अमरावती, मथुरा, नागार्जुनकोंडा या ठिकाणी बौध्द धर्मातील प्रतिकात्मक चिन्हांची निर्मिती झालेली दिसते. मथुरा शैलीत स्त्री शरीराला उत्तानभाव जास्त प्रमाणात द्यायला सुरवात केली. यातील एक मद्यपी स्त्रीचे शिल्प असून ते जास्त प्रमाणबध्द आणि चेतनामय आहे

आंध्रप्रदेशातील चित्तूर जिल्ह्यात गुड्डीमल्लम येथे इ. स. पूर्व ३ रे शतकातील आज अस्तित्वात असलेल्या लिंग पूजेचा सर्वात प्राचीन संदर्भ सापडतो. ही मूर्ती पाच फुट उंचीची असून पुरूष लिंग आकारातील पहीली मूर्ती आहे असे टी. गोपीनाथराव म्हणतात. सदरील मूर्तीच्या पाठीमागे पुरूष आकारातील लिंग असून त्याच्या समोर उजव्या हातात शिंग असलेला प्राणी, डाव्याहातात कुंभ आणि परशु धरलेली मनुष्याकृती आहे. तर त्याच्या पायाखाली एक जाडजूड यक्ष दाखविण्यात आलेला आहे. स्थानिक महात्म्यानुसार पल्लम म्हणजे युध्द भूमी तर गुड्डी म्हणजे मंदिर होय. परशुरामाने आई रेणुकेला मारल्यानंतर तो प्रायश्चित्त करण्यासाठी तिथे गेला होता. पुढे गुड्डीपल्लमचे अपभ्रंशात्मक गुड्डीमल्लम झाले असावे तर काही अभ्यासक पल्लव पासून पल्लम शब्दोत्पत्ती झाली असावी असेही मानतात.[८]

परशुराम शिवाची आराधना करण्यासाठी या स्थळी पोहोचला असता एक शिवलिंगाची स्थापना करून तिथे रोज एक उगविणारे दैवी फुल शिवपिंडीवर परशुराम वहात असे. या दैवीफुलाचे रक्षण करण्यासाठी

सहायक म्हणून चित्रसेन नावाचा यक्ष सोबत ठेवलेला होता. या यक्षास रोज एक प्राणी आणि भातभर ताडी द्यायचे कबूल करण्यात आले होते. कारण तिथे रोज एकच दैवी फुल उगवत असे आणि ते फुल परशुराम शिवलिंगावर अर्पण करीत असे. एके दिवशी चित्रसेन यास स्वतः भक्ती करावीशी वाटल्याने ते दैवी फुल शिवाला अर्पण केल्याने आणि दैवी फुल न मिळाल्याने दोघात घणघोर युध्द झाले. शवटी शिव प्रसन्न होऊन दोघानाही आपल्यात सामावून घेतले. त्यामुळे सदरील मूर्तीत शिवलिंग, परशुराम आणि यक्ष चित्रसेन कोरलेली आहेत. या प्रदेशावर पल्लव, गगपल्लव, बना, चोल यांची राजवटी होत्या. त्याच शिलालेखही मंदिराच्या बाहयांगावर कोरलेलेली आहेत. असेच एक शिल्प पट कुषाण काळातील इ. स. पू. १ ल्या शतकातील असून ते मथुरा संग्रहालयात ठेवण्यात आलेले आहे. या शिल्पास चित्रसेन म्हणजे ब्रम्हा, परशुराम म्हणजे विष्णू आणि शिव यांचे एकत्रित रूप असे मानतात. ८ व्या शतकातील थायलंड मध्ये ही एक पुरूष लिंगाप्रमाणे शिवलिंग मिळाले असून अर्धचंद्र, कुंडल, तिसरा नेत्र आणि पुष्टाप्रमाणे कुरळे केस आहेत. लिंगपूजेचे धागेदोरे ही जगभरातील संस्कृतीत पहावयास मिळतात जसे की, ग्रीस, रोम, असीरिया, अमेरिका, जर्मनी, स्लोवानिया, फ्रांस ई. ही लिंगपूजा परियापस, फसाइनम किंवा प्राइप, गाल्ला तसेच ओगिरिस या नावाने ओळखले जातात. एकमुखलिंग मूर्ती लखनौ संग्रहालयात आहे. जे वालुकाश्मात बनलेले असून मथुरा येथे सापडले होते. याच प्रमाणे कामाख्यामंदिरातील योनी आणि लिंगपुजेचे स्पष्ट पुरावे मिळतात. तर मंदिर स्थापत्यानुसार दम्पती शिल्पे किंवा मिथुन शिल्पे ही द्वारशाखावर कोरावित असे समरांगणसूत्रधार (६० / ३०–३८) या ग्रंथात सल्ला दिला आहे. अग्निपुराणातही मिथुनशिल्पांचे उल्लेख येतात याचा अर्थ ग्रंथांची याना मान्यता होती.

मंदिराच्याशुशोभिकरणासाठी सुरसुंदरी खोदाव्यात असे अपराजितपृच्छा, रूपमंडन ग्रंथात म्हटले आहे. या सुरसुंदरी ही कामशास्त्राच्या अनुषंगाने संदेश देत असतात. कामविकार नियंत्रणात असावा असे या सुरसुंदरी सांगत असतात. हाच संदेश नितीशास्त्र सांगत यातून कालौघात ब्रम्हचार्य आणि सन्यस्थवृत्ती अतिप्रमाणात वाढीस लागली. तंत्रराजतंत्र या तांत्रिक ग्रंथात सुरसुंदरी या तरूण, सौंदर्यशाली, चैतन्यमय असे वर्णन केले असून त्या साधकाला हवे ते प्रदान करतात. यांचे नेत्र स्थिर व विशाल खोदावित असे सांगताना त्याना योगिनी असे ही म्हटले आहे. शक्यता या मूर्ती उंच असल्यामुळे स्त्री शरीराला एक स्वाभाविक सौंदर्य लाभले आहे. खजुराहो येथील पत्रलेखिका किंवा कंदुकक्रिडामग्ना या पाठमोऱ्या दाखविलेल्या आहेत. रुक्मिणी स्वयंवरात राजकुमारीच्या शयनगृहात प्रणयी चित्र कोरावित असे म्हटले आहे. बहुतांश मंदिरावर दम्पतीची अलिंगन, चुंबन, नखक्षत, दंतक्षत, प्रेमाराधना करणारी शिल्पे पहायला मिळतात.

कामशिल्पाचा विचार करताना मंदिराच्या बाह्यांगावर कोरलेली ही शिल्पे नैसर्गिक कामक्रिडा करीत असलेली कमीच आहेत. खजुराहोच्या कंदरीया महादेव मंदिरावर केवळ ६१० कामशिल्पे आहेत. तर जी त्या मंदिरावरील मूर्तींच्या तुलनेत केवळ ३ टक्के आहेत.[*] या वरून एक बाब लक्षात येते की, मंदिरावर असलेल्या या कामशिल्पांची संख्या तुलनात्मकदृष्ट्या कमी असलीतरी जगाचे लक्ष केवळ कामशिल्प म्हणूनच खजुराहोवर आहे. चंदेलांची राजधानी असलेल्या महोबा येथेही कामशिल्पे सापडली आहेत. ग्वाल्हेरच्या किल्ल्यात तेली का मंदिर आहे. तेथील मूर्तींच्या चेहऱ्यावर कामक्रिडेचे स्पष्टभाव कोरलेले आहेत. मोढेरा

(गुजरात) प्रमाणेच मोहसान लिबोजी मदमदिरावरही कामशिल्पे आहेत तसेच राजस्थानातील राणकपूर येथील पार्श्वनाथ मदिरावरही आहेत ही कामशिल्पे ओरिसातील जगन्नाथ मदिर, सुर्यमदिर, मुखलिंगश्वर मदिर या वरही पहावयास मिळतात

**काम शिल्प निर्मिती मागिल कारणे**

चदेलवशाच्या शिलालेखात आणि पृथ्वीराज रासा या (महोबा खड) ग्रथातील उल्लेखानुसार काशीचा गहिवार राजा इद्रजित याचा हेमराज नामक एक पुरोहित होता त्याची कन्या हेमवती हीचा विवाह राजा इद्रजित सोबत झाला होता पण ऐन तारुण्यात ती विधवा झाली एकदा ती पौर्णिमेच्या रात्री स्वछदपणे स्नान करताना चद्र तिच्या सौंदर्यावर भाळला त्या दोघात प्रेम होऊन त्याना चद्रवर्मा नावाचा मुलगा झाला पुढे वशजमातेच्या पापक्षालनासाठी एक भाडनामक यज्ञ केला महोत्सवपूर म्हणजे आजचे महोबा जे खजूराहो जवळ आहे येथे हा यज्ञ करण्यात आला होता वशजमातेच्या स्वैर वर्तनाप्रमाणे पुन्हा असे घडू नये या साठी खजुराहोच्या मदिरावर कामशिल्पे कोरली असावित असा एक मतप्रवाह आहे[10] खजुराहोच्या या मदिराचा प्रभाव ओरीसातील सर्वच मदिरावर पहावयास मिळतो कुमारी पटना हे नाव तत्रशास्त्रातील कुमारी मुलींच्या वास्तव्यामुळे पडले आहे अशी मान्यता आहे (कुमारी पटना येथे सुआ तलुकी, ज्ञानदवी, मालुनी, नताई धोवणी, लहुकुटी लहुरूनी, पत्रपिढी, सहरूनी या सात जणीनी येथे तत्रशास्त्राची उपासना केली होती ) येथे तत्रशास्त्राचा प्रभाव सर्वाधिक असल्याचे अनेक पुरावे उपलब्ध होतात त्यावरुन तत्रशास्त्राचा प्रभाव ही या कामशिल्प निर्मीती मागे होता

ब्रम्हपुराण, भविष्यपुराण, साबपुराण[11], वराहपुराण या मध्ये साबची एक कथा आढळते त्यानुसार साब सुर्यउपासक कसा बनला याची माहिती मिळते साब हा कृष्ण आणि जाबवतीचा मुलगा होता तो अत्यत देखणा पुत्र नारदाने साबला श्री कृष्णाच्या स्त्रीया जिथे जलक्रिडा करीत होत्या (नग्न) तेथे नेले त्या सर्वजनी साबचे सौंदर्य पाहून मोहित झाल्या आणि त्याच्याशी लगट करू लागल्या तेव्हा नारदाने कृष्णाला तिथे आणले सारा प्रकार पाहूण कृष्णाने साबला कुष्टरोगी होशील असा शाप दिला साबने आपण कसे निर्दोष आहोत आणि नारदाने तिथे नेल्यामुळे आपल्यावर गुदरलेला प्रसग सागितला तेव्हा कृष्णाने मैत्रयवनात जाऊन सुर्य उपासना करायला सागितले सुर्य प्रसन्न होऊन त्याने आपल्या एकविस वळेस नामाचा जप करीत नदीत स्नान करावे असे सागितल्याने त्या वेळी साब यास एक सुर्य प्रतिमा सापडली त्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून तिथे एक भव्य मदिर उभारले हे मदिर मुलतान येथे असल्याचे बोलले जाते हा सारा सदर्भ पहाता विलासी जीवन कसे धोकादायक आहे हे सागण्यासाठीच कामशिल्प कोरली असावित[12]

सुर्य हा वेश्याचा देव असून रात्र वेश्यासाठी कटाळवाणी व दुखद असते, अशी समजूत वेश्यामध्ये प्रचलित होती रात्र सपूण सुर्योदय केव्हा होतो याची वाट वेश्या पहात असत म्हणून मोढेरा येथिल सूर्य मदिर वेश्यानी बाधले अशी एक समजूत आहे तसेच सूर्यामुळे नवजीवन प्राप्त होते सूर्य सुफलन आणि प्रजोत्पादन करतो, अशी ही कल्पना आहे तसेच वेश्या निधर्मी असल्यामुळे मुस्लीम शासक हात लावणार नाहीत ती

५. जोशी महादेव शास्त्री, संपा., भारतीय संस्कृती कोष, भारतीय संस्कृती कोष मंडळ, पुणे, खंड दुसरा, १९६४, पृ. २८७

६. किता, पृ. २५०

७. Academia eduupdates@academia-mail com

८. इंदुरकर उदयन, प्राचीन मंदिरे, मूर्ती आणि भावपूर्ण शिल्पे,भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे,२०१७, पृ. १८०

९. http //www jagran com/spiritual/mukhye-dharmik-sthal-a-thousand-year-old-history-0f-khajuraho-13075222 html

१०. श्रीसांब पुराण, भाग १, अनु. पं. निरंजन शर्मा, शाकद्वीपीय ब्राम्हण बंधू कार्यालय, ८४, बाबुलालभाय चाल चौपाटी, बम्बई, नं. ७, पृ. ७ – १०

११. देशपांडे सु. र., भारतीय कामशिल्पे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. १६

१२. किता पृ. २९

१३. किता

१४. उपरोक्त, इंदुरकर, पृ. १८३